# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

*महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित*

*औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.*

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172


*No: CGRF/AZ/AUR/ R / 266 / 2009 / 100 /* *Date :-*

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Rural Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:-* Forwarding of grievance in respect of Shri Raosaheb Shankerrao Gaike, R/o Sultanabad ,Post Lasur Station, Tq.Gangapur,Dist. Aurangabad.
(Consumer No.508800003966 )

*Dear Sir,*

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Raosaheb Shankerrao Gaike, R/o Sultanabad, Post Lasur Station, Tq.Gangapur,Dist. Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 22.12.2009 at 11= 30 Hrs. onwards.

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

Copy to:-

Shri Raosaheb Shankerrao Gaike,
R/o Sultanabad ,Post Lasur Station,
Tq.Gangapur,
Dist. Aurangabad.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**
**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/२६६/२००९/१००**

**तक्रार दाखल दिनांक :- ०५/१२/२००९**
**निकाल दिनांक :- ०४/०२/२०१०**

**श्री रावसाहेब शंकरराव गायके,**
**मु. सुलताबाद पो. लासूरस्टेशन,**
**ता.गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.५०८८००००३९६६) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत ग्रामीण विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |
| | **वि. सु. काबरा** | **सदस्य** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०५/१२/२००९ रोजी औरंगाबाद ग्रामीण परिमंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २२/१२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे.त्याचा ग्राहक क्रमांक ५०८८००००३९६६ असा आहे. माहे ऑक्टोबर २००४ पर्यंत ग्राहकास मीटर रिडींग प्रमाणे वीज बिल देण्यात येत होते. ऑक्टोबर २००४ पर्यंत ग्राहकाने ३३१४ रिडींग पर्यंत सर्व वीज देयकाचा भरणा केलेला आहे. माहे डिसेंबर २००४ मध्ये महाविरतण कंपनीने एकदम मागे जाऊन मागील रिडींग ३३१४ व चालु रिडींग १४४३ दाखवुन सरासरी आकारणीचे वीज बिल दिले.वरील वीज बिलाबाबत ग्राहकाने संबंधित उपविभागाकडे तक्रार दाखल केली परंतु वीज बिल दुरुस्त झाले नाही.व फेब्रुवारी २००६ पर्यंत ११६७०/-रुपयाचे चुकीचे वीज देयक देण्यात आले. माहे फेब्रुवारी २००६ मध्ये ग्राहकाचे जुने मीटर बदलुन नविन मीटर बसविण्यात आले, परंतु वीज बिल दुरुस्त करण्यात आले नाही.त्यामुळे ग्राहकाने या मंचात तक्रार दाखल करुन वीज बिल दुरुस्त करुन देण्याबाबत व व्याज व दंडाची रक्कम रद्द करण्याबाबत विनंती मंचास केली.

२) दिनांक २२/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी सौ.चिवंडे, श्री एस.व्ही. जोशी सहाय्यक लेखापाल उपस्थित होते व वीज ग्राहक गैरहाजर होते. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचे सी.पी.एल. व सुधारीत वीज बिल प्रस्ताव सादर केला.ग्राहकाचे मीटर माहे फेब्रुवारी २००६ मध्ये बदलण्यात आले त्याचा अहवाल सादर करण्यास सांगुन मंचाने सुनावणीची पुढील तारीख २९/१२/२००९ रोजी ठेवली.

३) दिनांक १९/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी प्रतिनिधी श्री एस.व्ही.जोशी व ग्राहक उपस्थित होते. ग्राहकाने वैयक्तीक कामामुळे सुनावणाची पुढील तारीख देण्याची विनंती मंचास केली. ग्राहकाच्या विनंती नुसार पुढील तारीख १२/०१/२०१० रोजी ठेवण्यात आली.

४) दिनांक १२/०१/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी प्रतिनिधी व वीज ग्राहक उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी ग्राहकास माहे डिसेंबर २००४ ते मार्च २००६ या कालावधीत मीटर रिडींग न घेता चुकीचे देयक देण्यात आल्याचे मान्य करुन वरील कालावधीतील वीज बिलात दुरुस्ती करुन मीटर रिडींग प्रमाणे ६३२६.३५/-रुपयाचे क्रेडीट दर्शविणारा सुधारीत वीज बिल प्रस्ताव मंचात सादर केला.वरील प्रस्तावाचे निरीक्षण केले असता त्यामध्ये व्याजाची रक्कम कमी केली नसल्याचे अढळून आल्यामुळे मंचाने व्याज व दंडाची रक्कम वजा करुन सुधारीत वीज बिल दुरुस्ती प्रस्ताव दिनांक १८/०१/२०१० पर्यंत मंचास सादर करण्यास सांगुन प्रकरण निकालासाठी ठेवले.

५) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की,माहे ऑक्टोबर २००४ (अंतिम रिडींग३३१४) पर्यंत वीज बिलाची ग्राहकाची कोणतीही तक्रार नव्हती.माहे डिसेबर २००४ मध्ये महावितरण कंपनीने ग्राहकाचे मागील रिर्डींग ३३१४ व चालु रिडींग १४४३ असे दर्शवुन चुकीचे मीटर रिडींग घेवुन वीज बिल दिले.त्यामुळे मार्च २००६ पर्यंत चुकीच्या व अवास्तव वीज देयकाची आकारणी ग्राहकास झाली. ग्राहकाने वीज देयक मीटर रिडींग नुसार दुरुस्त करुन देण्याकरीत महावितरणचे संबंधित उपविभागीय कार्यालयाकडे तक्रार दाखल केल्यानंतर त्यांचे जुने मीटर बदलुन त्याजागी नविन मीटर बसविण्यात आले परंतु वीज बिल दुरुस्त करुन देण्यात आले नाही.

६) सुनावणीच्या दरम्यान ग्राहकाच्या सी.पी.एल.नुसार महावितरण कंपनीने केलेल्या चुकीच्या वीज बिलाची आकारणी नोडल अधिकारी प्रतिनिधी यांना मंचाने दाखवुन दिल्यानंतर मंचाच्या आदेशानुसार नोडल अधिकारी यांनी सुधारीत वीज बिल दुरुस्ती प्रस्ताव सादर केला त्यामध्ये सी.पी.एल.प्रमाणे माहे डिसेंबर २००९ अखेर ग्राहकाकडे प्रलंबित असलेले ९८३४.३६/- रुपये वीज बिलामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्याचे महावितरण कंपनीने मान्य केले.

| | | |
|---|---|---|
| १) | थकीतबाकी वजावट रुपये | ६३२६.३५ |
| २) | विलंब आकार व दंडाची रक्कम | ५२७.४० |
| ३) | व्याजाची वजावट रुपये | ३७३६.९० |
| | एकुण वजावट रुपये | १०५९०.६५ |

डिसेंबर २००९ अखेर (९८३४.३६-१०५९०.६५)= वजा रुपये ७५६.२९ (क्रेडीट वीज बिल)

महाविरतण कंपनीने वरील प्रमाणे माहे डिसेंबर २००९ अखेर ७५६.२९ रुपये क्रेडीट वीज बिलाचा प्रस्ताव सादर केला व तो योग्य असल्यामुळे मंचाने मंजुर केला आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने मंचात सादर केलेल्या प्रस्तावानुसार ग्राहकाचे वीज बिलामध्ये सुधारणा करुन माहे डिसेंबर २००९ अखेर ग्राहकास रुपये ७५६.२९ चे क्रेडीट वीज बिल निर्गमीत करावे.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |

२००९/१००

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/२६६/२००९/१०० दिनांक :-

प्रति
श्री रावसाहेब शंकरराव गायके,
मु. सुलताबाद पो. लासूरस्टेशन,
ता.गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.
(ग्राहक क्र.५०८८००००३९६६)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/ग्रामीण/**२६६/२००९/१००** )

आपण दिनांक ०५/१२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.